महाराष्ट्र टाइम्स

पुणे । शनिवार, २९ सप्टेंबर २०१८ । arth.mtonline.in

## सिटी स्कूलची आगेकूच

**पुणे :** सातारा रोडच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलने शिक्षण विभाग (पुणे मनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्यातर्फे आयोजित १७ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत सेंट अँथनी स्कूलवर दहा विकेटनी मात केली.

**संक्षिप्त धावफलक :** सेंट अँथनी स्कूल - १० षटकांत २ बाद ७२ (जॅसन श्रीसुंदर नाबाद ३०, दानिश मणियार १२, मानस परांजपे १-२०, अथर्व काळे १-९) पराभूत वि. सिटी इंटरनॅशनल स्कूल - बिनबाद ७४ (जुनेद खान नाबाद १४, आर्य दांगट नाबाद ११); आर्मी पब्लिक स्कूल - ३ बाद ७८ (कौशिक सिंदे ४८) वि.वि. लोकसेवा स्कूल - १० षटकांत ९ बाद ६३ (आदित्य ठक्कर ८, सार्थक शिंदे ३-११, देव कदम २-५).

## टेनिस स्पर्धा आजपासून

**पुणे :** मंदार वाकणकर टेनिस ॲकॅडमीच्या वतीने अरुण वाकणकर स्मृती करंडक टेनिस स्पर्धेचे २९ आणि ३० सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. डेक्कन जिमखाना क्लबच्या टेनिस कोर्टवर ही पुरुषांची स्पर्धा होणार आहे.